# गीता एक जीवनग्रंथ (भाग १-२)



मी जेव्हा आईच्या गर्भात होतो तेव्हा आईने स्वामी विवेकानंदांचं चरित्र आणि त्यांची अनेक पुस्तकं वाचली होती. त्या प्रभावातून तिने माझं नाव 'विवेक' ठेवलं, असं माझ्या बहिणींनी मला सांगितलं. १९८२ साली मी एकदा रेल्वेतून प्रवास करत होतो. तेव्हा माझी एका सहप्रवाश्याशी ओळख झाली. त्यांच्याशी बोलण्यातून मला दोन गोष्टी समजल्या. एक म्हणजे आजच्या हिंसेच्या वातावरणात बदल घडवण्यासाठी गांधीजींचे विचार फार महत्त्वाचे ठरतील आणि ते देवतुल्य व्यक्तित्व असल्याचं लोकांच्या लक्षात येईल. दुसरी गोष्ट म्हणजे मनुष्याने आयुष्यात एकदा तरी गीता वाचली पाहिजे. तुमच्या मनात जी खळबळ आहे, तिला एकच उत्तर आहे गीता!

कालांतराने मी गीता वाचण्यास सुरुवात केली आणि आजही मी तिचं वाचन करीत असतो. दररोज गीतेचा किमान एक तरी श्लोक मी वाचतो. अशाप्रकारे गीतेचं नियमित वाचन करत असूनही प्रत्येक वेळी मला गीता नवीनच वाटते, आणि मी ती प्रथमच वाचत आहे असं वाटतं. गीता अशी अगाध आहे. आतापर्यंत अनेक थोरांनी गीतेवर मंथन केलं आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी गीतेतील ज्ञान प्राकृतात आणण्यासाठी 'ज्ञानेश्वरी' लिहिली, विनोबांनी गीतेवर प्रवचनं दिली. गीताई हा ग्रंथ लिहिला. लोकमान्य टिळकांनी मंडाले येथील कारावासात असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. गीतेचा अभ्यास आजतागायत अखंड चालू आहे.

मी माझ्या मुलीचं नाव गीता असं ठेवलं, त्यामागे माझा एकप्रकारचा स्वार्थ आहे. गीतेचं महात्म्य इतकं आहे की, माणसाने मरताना जरी गीता हा शब्द उच्चारला तरी माणसाला सद्‌गती प्राप्त होते, असं म्हणतात. मरणशय्येवर असताना माणसाला त्याच्या जवळच्यांची, जीवलगांची आठवण असते. आपल्या जीवलगांची नावं तो उच्चारतो, म्हणजे मी मरणशय्येवर असेन तेव्हा माझ्या ओठांवर माझ्या मुलीचं नाव येईल आणि त्या निमित्ताने 'गीता'हा शब्द माझ्या मुखातून उच्चारला जाईल. तिचं नाव हे ठेवण्यामागे हा माझा स्वार्थ आहे. मी गीता वाचायला सुरुवात केली तेव्हा मी महाविद्यालयीन विदयार्थी होतो. मी वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घ्यायचो. एकदा माझी निवड राष्ट्रीय पातळीवरील आंतर विद्यापीठ वक्तृत्व स्पर्धेसाठी झाली. ही स्पर्धा त्यावेळी कुरुक्षेत्र विद्यापीठात होणार होती. हा मला विलक्षण योगायोग वाटला होता. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला ज्या ठिकाणी गीता सांगितली ते हे क्षेत्र, त्या ठिकाणी स्पर्धेसाठी माझी निवड झाली होती. त्यामुळे गीतेवरील माझा विश्वास अधिक दृढ झाला. आजही माझं असं मत आहे की, गीता वाचन आणि गीता पठण हे ऐच्छिक व पारलौकिक दोन्हींमध्ये परिणामकारक आहे. हा दृढ विश्वास ठेवून प्रत्येकाने आपल्या जीवनात गीतेतील योगमार्गानुसार आचरण ठेवलं तर त्याचं, त्याच्या समाजाचं, त्याच्या राष्ट्राचं आणि संपूर्ण जगाचं कल्याण होईल.

माझ्या लहानपणी गीतापठणाच्या अनेक स्पर्धा व्हायच्या. बाराव्या अध्यायाचं पठण त्यात असायचं; पण ती केवळ घोकंपटी असायची. त्यामुळे अर्थ समजायचा नाही. चौथीत स्कॉलरशिपच्या परीक्षेचा वर्ग एक शिक्षक घ्यायचे. गीतेचा बारावा अध्याय वाचूनच वर्ग सुरू करायचा असा त्यांचा नियम होता. या शिक्षकांनी गीतेच्या बाराव्या अध्यायाचं महत्त्व सांगितल होतं. आता गीता वाचताना प्रत्येक अध्यायाचं महत्त्व समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत असतो. गीता जर जाणीवपूर्वक वाचली तर आजच्या दैनंदिन जीवनात गीतेमध्ये सांगितलेल्या गोष्टींचा उपयोग करता येऊ शकतो. मग ते घर असो किंवा ऑफिस असो. वेगवेगळ्या शास्त्रामध्ये अलीकडे व्यवस्थापन-शास्त्राला खूप महत्त्व आलं आहे, त्यामध्ये गीतेत सांगितलेल्या गोष्टींचा उपयोग करता येईल असं मला वाटतं. माझ्या जीवनात ज्या गोष्टी मला प्रेरणादायी ठरल्या त्यामध्ये भगवद्‌गीता अग्रस्थानावर आहे, त्यामुळेच या पुस्तकात गीतेवर एक प्रकरण असावं अशी माझी मनापासून इच्छा आहे आणि ती इथे मी साकार करीत आहे.

आपल्या साऱ्यांना माहीत आहे की कुरुक्षेत्रावर लढाईसाठी उतरल्यानंतर

अर्जुनाला शत्रू पक्षात आपलेच बांधव, सगेसोयरे दिसले आणि तो हंतोत्साहित झाला, हतबल झाला. त्याच्या रथाचं सारथ्य करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी त्याची ही अवस्था ओळखून त्याला जो उपदेश केला, तो म्हणजेच 'गीता' होय. गीतेचा पहिला अध्याय हा अर्जुन विषाद योग हा आहे. आज आपण प्रत्येक जण जीवनामध्ये लहान-मोठी लढाई लढत असतो. आपल्या समोर अनेकदा पेच उभे राहतात. छोट्याछोट्या निर्णयापासून मोठे मोठे निर्णय घेण्यापर्यंत आपली मन:स्थिती द्विधा होत असते. शेक्सपियरच्या 'हॅम्लेट'या नाटकात हॅम्लेटची जशी हा दिवा मालवू की तो दिवा मालवू अशी स्थिती होते, तशी अनेकदा आपल्याबाबतीत होत असते. दुसरं म्हणजे, आपण एकतर भूतकाळाचा विचार करतो, नाहीतर भविष्यकाळाचा करतो. वर्तमानकाळाचा आपण फारच कमी विचार करतो. आपण आतापर्यंत कसे आलो, कसे तयार झालो आणि पुढे काय होईल याचा विचार करत राहतो. रणांगणात उतरल्यावर अर्जुनही अशाच विचारांमध्ये अडकला होता. अशा परिस्थितीत माणसाला कुठलीही पळवाट नसते. अशा वेळी श्रीकृष्णाने अर्जुनाला तत्त्वनिर्णयाविषयी जे सांगितले ते महत्त्वाचं आहे. हे महायुद्ध आहे आणि ते तत्त्वनिर्णयासाठी आहे. एका ठिकाणी भगवान श्रीकृष्णांनी असं म्हटलं आहे की, 'ज्या ठिकाणी तत्त्वनिर्णयासाठी वादविवाद चालतात, त्या ठिकाणी मी आहे.' त्यामुळे हे लक्षात घेतलं पाहिजे की जर युद्ध चांगल्याची स्थापना करण्यासाठी, तत्त्वासाठी असेल तर ते युद्ध हे आपलं कर्तव्य आहे आणि याबाबतीत जर द्विधा अवस्था झाली असेल तर भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेलं 'कर्मण्येवाधिकारस्ते मां फलेषु कदाचना।' हे वचन ध्यानात घेतलं पाहिजे. श्रीकृष्णांचं म्हणणं आहे की, कर्म करणं तुझ्या हातात आहे, कर्माचं फळ तुझ्या हातात नाही. जे घडतं ते चांगल्यासाठी घडत असतं. तू फळाची अपेक्षा न ठेवता कर्म कर. श्रीकृष्णाचं हे वचन कार्यप्रेरणा देणारं आहे. माणसाला कर्मापासून परावृत्त करण्यासाठी अनेक घटक अवतीभोवती असतात. उदाहरणार्थ, आळस किंवा तामसी गुण वगैरे. त्यांना टाळलं पाहिजे. कर्माचं फळ, भले अनुकूल मिळेलं किंवा प्रतिकूल मिळेल, पण कार्यरत राहिलं पाहिजे अशाप्रकारे कर्माचा सिद्धान्त सांगणारा हा ग्रंथ आहे.

माणसाला सगळ्यात जास्त भीती कशाची वाटते, तर मृत्यूची. मी कुठेतरी वाचलं होतं की, माणूस काळजी का करतो? तो आजारी असेल तर त्याला काळजी असते की मी यातून वाचेन की नाही? तो वाचला तर त्याला काळजी रहात नाही, पण समजा नाहीच वाचला, तर त्याला काळजी वाटते की मी स्वर्गात जाईन की

नरकात जाईन? स्वर्गात गेला तर त्याला काळजी करण्याचं कारणचं नाही पण तो नरकात गेला तरीसुद्धा त्याला काळजी करण्यासाठी काही कारण नाही, कारण तिथे त्याचा सगळा वेळ त्याच्या मित्र मंडळींना भेटण्यात आणि त्यांना 'हाय-हॅलो' करण्यात निघून जाईल. त्यामुळे तुम्ही चिंता सोडा. यातला विनोदाचा भाग बाजूला ठेवला तरी त्यातील मार्मिक अर्थामुळे हे टिपण माझ्या कायमस्वरूपी स्मरणात राहिलं आहे. बोध हाच आहे की, माणसाने शक्यतोवर चिंता करू नये. चिंतेचा आपल्या मनावर ताण येतो, निर्णय घेताना आपली मन:स्थिती द्विधा होते. आपण अर्जुनासारखे विषाद योगात जातो. त्यामुळे आपण जे काही निर्णय घेतले असतील त्यावर ठाम राहून आपण त्यांची काळजीपूर्वक अमंलबजावणी करणं हे आपलं कर्तव्य आहे.

बऱ्याचदा असं घडतं की, एखाद्या विषयाकडे आपण जातो आणि त्याचं आपल्याला व्यसनं जडतं. एखाद्या विषयाचं माणूस चिंतन करत राहतो, या चिंतनातून त्याला त्या विषयाची आवड निर्माण होते, या आवडीतून इच्छा निर्माण होते, त्यातून व्यसनं आणि व्यसनातून क्रोध निर्माण होतो. क्रोधामुळे विवेक सुटत जातो आणि अविवेकामुळे विस्मरण होतं. विस्मरणामुळे निश्चयात्मक बुद्धी नष्ट होते आणि बुद्धिनाश झाला की सर्वस्वाचा नाश होतो. आज आपण समाजात अशा अनेक गोष्टी घडताना पाहतो. पैशांच्या लालचेतून लोक आपलं कर्तव्य विसरतात आणि भ्रष्टाचार करतात, रागाच्या भरात एखादं भयंकर कृत्यं करतात, दारू वगैरे व्यसनांच्या आहारी जातात. अशा वर्तनावर जर नियंत्रण ठेवलं नाही तर माणूस विनाशाकडे जातो. श्रीकृष्णानी गीतेमध्ये हे स्पष्ट सांगितलं आहे. श्रीकृष्णानी ज्या काळात अर्जुनाला गीता सांगितली त्यावेळी मला नाही वाटत आज जितके धर्म, पंथ जगात आहेत, त्यापैकी कुठले अस्तित्वात होते, त्यामुळे हा कुठल्या धर्माचा, पंथाचा ग्रंथ नाही या दृष्टीने या ग्रंथाकडे बघण्याचं काही कारण नाही. गीतेमध्ये जीवनाचं तत्त्वज्ञान सामावलेलं आहे. हे तत्त्वज्ञान एकप्रकारे संक्षिप्त स्वरूपात पण तितक्याच सविस्तरपणे सांगण्याचा प्रयत्न यात आहे. असा हा कदाचित एकमेव प्रयोग असावा. खरंतर हे एक संभाषण आहे. तो एक 'मोटिव्हेशनल प्रोग्रॅम' किंवा कार्यप्रवण करणारा कार्यक्रम आहे, असं आपण मानलं पाहिजे. त्यावर कोणत्याही धर्म, पंथाचा शिक्का मारू नये, असं मला वाटतं.

कर्माच्या बाबतीत गीतेमध्ये स्पष्ट सांगितलं आहे की, तुम्हाला जे काही कर्म करायचं आहे, ते करायचंच आहे, आणि जरी आपण कर्म केली नाहीत असं म्हणतो

तरी ती कर्म होतातच. कर्म हे जीवनचक्र आहे. तो एक यज्ञ आहे. ही यज्ञसाधना करून तुम्ही तुमचा अभ्युद्य साधा. हा यज्ञ साधताना जे तुमच्या बरोबर आले, ज्यांच्या कल्याणासाठी तुम्ही हे आरंभलं त्यांना तुम्ही संतुष्ट करा; मग ते सुद्धा तुम्हाला काही देतील ते तुम्ही त्यांना परत द्या. अशा प्रकारचं हे जीवनचक्र आहे म्हणजे यज्ञापासून पर्जन्य तयार होतं, पर्जन्यापासून (पाण्यापासून) अन्न तयार होतं आणि कर्मापासून यज्ञाची उत्पत्ती होते. थोडक्यात, अशाप्रकारच्या जीवनचक्राचा उल्लेख या ग्रंथात केला आहे.

तुम्ही जे कर्म कराल, ते तुम्ही व्यवस्थित केलं पाहिजे ते लोकांपर्यंत पोहचलं पाहिजे तुमचं स्वतःचं, तुमच्या कुटुंबाचं, तुमच्या समाजाचं हित त्यामध्ये तुम्ही पाहिलं पाहिजे एखादा राजा एखादं फर्मान काढतो आणि जनता त्याचं पालन करते. ते फर्मान जनतेच्या हिताचं असलं पाहिजे. एखादा संशोधक एखादा शोध लावतो, एखादी ज्ञानी व्यक्ती जीवनाचं तत्त्वज्ञान सांगते. लोक अशा संशोधकाच्या, ज्ञानी लोकांच्या मागे जातात. त्यांचं अनुकरण करतात. शेवटी जगात नेतृत्व करणारे लोक थोडे असतात, त्यांच्या मागे जाणारे पुष्कळ असतात. त्यामुळे जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्यांनी आपला आदर्श निर्माण केला पाहिजे लोकांनी आदर्श घ्यावा असं तुमचं काम असलं पाहिजे; तुमचं काम गृहोपयोगी असेल तर तुमच्या कुटुंबासाठी ते आदर्श असलं पाहिजे तुम्ही व्यवसायात असाल तर तुमच्या व्यवसायातल्या लोकांवर तुमचा ठसा उमटला पाहिजे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे सुखाने आचरता येणाऱ्या परधर्मापेक्षा गुणाने स्वधर्म श्रेष्ठ असतो. स्वधर्मामध्ये मरण आलेलं कल्याणकारक होईल परंतु परधर्माचं आचरण घातक ठरेलं. इथे धर्म ही कल्पना आपण समजून घेतली पाहिजे. आज प्रचलित असलेले वेगवेगळे धर्म असा याचा अर्थ नाही, तर हे तुमच्या स्वत्वाशी, स्वभावाशी आणि तुमच्या स्थायीभावाशी निगडित आहे. तुमच्या वृत्तीशी निगडित आहे. तुम्ही जे काही आहात, जसे आहात, जे काही करू शकता ते तुम्ही केलं पाहिजे, त्याचं आचरण केलं पाहिजे. काही वेळा काहीतरी वेगळं आणि अवास्तव करण्याची माणसाची इच्छा होते. काहीजणांची आपलं काम सोडून इतरांच्या कामात नाक खुपसण्याची वृत्ती असते. अलीकडे गाजलेल्या 'थ्री इडियट' चित्रपटाने हा संदेश देण्याचा प्रयत्न केला, की जी तुमची आवड आहे, जी तुमची इच्छा आहे, जो तुमचा मार्ग आहे त्याचा तुम्ही स्वीकार केला, तर तुम्ही यशस्वी होऊ शकता तुमच्या इच्छेनुसार

तुम्ही कार्य करा. गीतेचाच हा संदेश आहे. दुसरं म्हणजे, आपली वेगवेगळी इंद्रियं आहेत, इंद्रियांची वेगवेगळ्या प्रकारची सुखं आहेत, वेगवेगळ्या प्रकारच्या वासना आहेत. इंद्रियं सुखांच्या मागे लागून तुम्ही पथभ्रष्ट होऊ शकता आणि स्वतःला विनाशाकडे नेऊ शकता. त्यामुळे त्यावर आपण नियंत्रण ठेवलं पाहिजे. नियंत्रण साधलं पाहिजे.

गीतेमध्ये अनेक ठिकाणी भगवंताने आपल्याला हमी दिली आहे की, 'बाबांनो तुम्ही चांगल काम करीत राहा, तुमचं कधीही वाईट होणार नाही किंवा तुम्हाला कुठलीही अडचण येणार नाही.' एका ठिकाणी त्यांनी म्हटलं आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारतः ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्म्यानं सृजाम्यहम् ।

हे अर्जुना, ज्या ज्या वेळी धर्माला मरगळ येईल. धर्म ऱ्हासाकडे जाईल त्या त्या वेळी धर्माच्या पुनर्उत्थानासाठी मी जन्म घेईन. पुढे त्याने म्हटलं आहे :

परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

संत सज्जनांच्या रक्षणासाठी, दुष्टांचा व दुष्ट कृत्यांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची पुन्हा संस्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात मी जन्म घेईन. एकप्रकारे परमेश्वराने प्रत्येक मानवाला दिलेली ही हमी आहे, गीतेत अनेक ठिकाणी असं म्हटलं आहे की, अगदी छोटं छोटं काम सुद्धा धर्माचे आचरण, म्हणजेच चांगुलपणाचं आचरण तुमचा मोठ्यात मोठ्या तणावापासून बचाव करू शकतं. सुख-दुःखापासून अलिप्त, मत्सररहित यशापयशाविषयी समदृष्टी ठेवणारा पुरुष कर्म करून देखील अलिप्त राहू शकतो, मोक्षाकडे जाऊ शकतो. म्हणजे आपण जीवनात अशाप्रकारे राहिलं पाहिजे. जीवनात सुख नसलं, अपयश मिळालं असलं तरी माणसाने त्यापासून अलिप्त राहून त्याबद्दल समदृष्टीने विचार केला तर त्याला काही अडचण येत नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेवाधर्म. उदाहरणार्थ, विद्यार्थ्याने गुरुजींची सेवा केल्यामुळे, त्यांच्याशी नम्रतापूर्वक आचरण केल्यामुळे गुरूकडून त्याला उत्तम ज्ञान प्राप्त होते, त्याला आत्मज्ञान संस्कार मिळतात. म्हणजेच कोणाकडूनही काही ज्ञान मिळवायचं असेलं तर ते ज्ञान तुम्हाला त्यांची सेवा केल्यामुळे मिळेल. सेवा हा आपला धर्म झाला पाहिजे.

कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्ही मोक्षदायक असले तरी कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोगाची योग्यता अधिक असते. माणसाने संसाराच्या त्याग करून काही वेगळ्या प्रकारची वाट धरण्यापेक्षा त्याने कर्म स्वीकारलं पाहिजे. आपल्याला हे समजून घेतलं पाहिजे की लोकांची कर्तृत्वशक्ती, त्यांनी करावयाची कर्मं आणि कर्मांची फळं या गोष्टी परमात्मा स्वतः करत नाही तर तो आपल्या प्रकृती स्वभावाचा खेळ असतो. आपण परमेश्वराकडे सतत काही ना काही मागत राहतो; आणि ते नाही मिळालं तर त्याला दोष देतो, त्याला नावं ठेवतो, हे योग्य नाही; कारण जे करावयाचे ते आपल्यालाच करायचे असते. आपल्या प्रकृती स्वभावावर ते अवलंबून असतं. असा हा कर्मयोग आहे.

सर्वांकडे समदृष्टीने पाहिलं आणि खरा साधू तोच असतो. जो काम क्रोधाचा वेग सहन करतो किंवा त्यांचा त्याग करतो. गीतेमध्ये असा उल्लेख येतो की मोक्षाची उत्कट इच्छा करणारा, जो दृष्टी भुवयांच्या मध्य बिंदूवर स्थिर करून नाकातून वाहणाऱ्या प्राण आणि अपान वायूंची गती सम ठेवून इंद्रिये मन व बुद्धी त्याजून जातात; वासना, भय, क्रोध यांच्यापासून अलिप्त असतात. तो मोक्षाप्रत जाऊ शकतो.

अनेक माणसांची वृत्ती ही स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर टाकण्याची आणि चांगलं झाल्यास श्रेय मात्र स्वतःच घेण्याची असते. अशी माणसं इतरांना क्लेश देतात. खरं तर मनुष्याने स्वतःची कामं स्वतःचं केली पाहिजेत आणि त्याचं श्रेय घेण्याचा अट्टाहास करू नये. याचं कारण सर्वांप्रती आपली दृष्टी सम असली पाहिजे. आपणच आपला सखा आणि आपणच आपला बंधू असतो, आपल्यात आपपर भाव असू नये. आपणच आपला उद्धार करीत असतो. आपणच आपल्याला मदत करत असतो. त्यामुळे जे योग्य आणि चांगलं आपण करू त्याचा आनंद आपल्याला मिळेल आणि ज्या चुका आपण करू त्या आपल्यालाच भोगाव्या लागतील.

भगवंतांनी गीतेत म्हटलं आहे, 'योगक्षेमं वहाम्यहम' आयुर्विमा महामंडळाने गीतेतील ही उक्ती आपलं बोधवाक्य म्हणून स्वीकारली आहे. परमेश्वर म्हणतो, जे लोक माझी भक्ती करतात, मला मानतात, त्यांची काळजी मी घेतो. परमेश्वराने दिलेली ही आणखी एक हमी आहे. भगवंतांनी गीतेत एका ठिकाणी म्हटलं आहे की, हे अर्जुना अतिशय खाणारा किंवा मुळीच न खाणारा, अती झोपाळू किंवा अती जागरण करणारा यांना हा योग साधत नाही. कुठला योग? तर दुःखनाशक योग. तुम्हाला जर परमशांती पाहिजे असेल तर त्याचा आहार, विहार, कर्माचरण, निद्रा व

जागृती ही यथायोग्य असतात त्यालाच हा दुःखनाशक योग साधतो. थोडक्यात, कोणत्याही गोष्टीचा दोन्ही टोकांचा अतिरेक हा दुःखाची निर्मिती करीत असतो. आज आपण पाहतो की आहार-विहारावर नियंत्रण न राखल्याने कर्मांच्या बाबतीत समतोल न राखल्यामुळे तसंच निद्रा व जागृती या दोन्ही बाबतीत तारतम्य न ठेवल्यामुळे माणसांना विविध आजारांना सामोरं जावं लागतं आहे. यातील काही आजार तर जीवघेणे असतात; उदाहरणार्थ, हृदयविकार, कर्करोग, मधुमेह वगैरे. आज सगळीकडे जी अशांतता दिसते तिच्या मुळाशी देखील माणसाचं अशाप्रकारचं असंयमी वर्तनच आहे. अनेक लोकांच्या मध्ये ईश्वराच्या प्रति भक्ती असते. परमेश्वराने दाखवलेल्या मार्गाने चालण्याची त्यांची इच्छा असते; पण त्यांचे प्रयत्न अर्धवट असतात. आधी ते मनापासून प्रयत्न करतात पण नंतर ढिले पडतात. मोक्ष प्राप्त होण्याच्या आधीच ते सिद्धीपासून भ्रष्ट झाले तर त्यांचं काय होईल? इथे पुन्हा भगवंतांनी हमी दिली आहे. त्यांनी असं सांगितलं आहे की, हे अर्जुना अशा पामराला इहलोकी किंवा परलोकीही विनाश नाही कारण सत्कार्य करणारा कोणीही अधोगतीला जात नाही. वस्तुस्थिती ही आहे की, तुम्ही जर चांगली कामं करीत गेलात तर तुमची अधोगती नक्कीच होणार नाही. असं म्हटलं गेलं आहे की, योगभ्रष्ट झालेली व्यक्तीसुद्धा तिच्या संचिताच्या बळाबर चांगल्या व श्रेष्ठ माता-पित्याच्या पोटी जन्म घेऊ शकते. हे फार महत्त्वाचं आहे. मी म्हणतो की, मी विवेक क्षीरसागर म्हणून जन्माला आलो, एखाद्या मोठ्या घराण्यात मी का जन्मलो नाही? हा प्रश्न प्रत्येकालाच पडत असतो. त्याचं उत्तर इथे मिळतं आपण एकमेकांचा मत्सर किंवा हेवा करण्याचं कारण नसतं कारण प्रत्येकजण आपल्या आपल्या गतीनुसार पुढे जात असतो. त्यामुळे तुमच्या स्थितीबदल तुम्हाला वाईट वाटू नये, तुम्हाला दुःख वाटू नये.

आपण जे बल प्राप्त करतो ते बल वासना आणि आसक्तीरहित असलं पाहिजे विश्वबंधुत्वाची भावना आपण जपली पाहिजे. जगात जे आहे ते सगळं सुंदर आहे, जगात जे काही आहे ते माझं आहे आणि जे माझं आहे ते सगळ्यांचं आहे, अशी जेव्हा आपली भावना असेल तेव्हा एकमेकांना ओरबाडण्यातला आपला रस संपेल. सात्विक राजस आणि तामस या भावाबद्दल गीतेमध्ये सांगितल आहे. सात्विक भाव आपण जपला पाहिजे. तामसी भाव आपण टाळला पाहिजे. आजकाल आपण पाहतो की तामसी आहाराकडे आपला ओढा वाढला आहे त्यामुळे आपले विचारही तामसी बनले आहेत. आपल्या आहार-विहाराचा, वर्तनाचा अशाप्रकारे आपल्या

मना बुद्धीवर परिणाम होत असतो. म्हणून कोणत्याही बाबतीतला तामसीपणा आपण टाळला पाहिजे, सोडून दिला पाहिजे आणि सर्वप्रकारे सात्विक जीवन जगण्याचा प्रयत्न करत राहीलं पाहिजे

माणसाने कोणत्या काळात देहत्याग केला म्हणजे त्याला मुक्ती मिळते? गीतेने या संदर्भात मार्गदर्शन केलं आहे. दिवसा सूर्यप्रकाश असताना तसेच शुक्लपक्षात आणि उत्तरायण काळात मृत्यू पावलेली व्यक्ती ब्रह्मपदाला जाते, असं म्हटलं आहे. तुम्हाला मृत्यू कसा यावा हे तुमच्या हातात नसतं. त्यासाठी इच्छामरणाची शक्ती तुम्हाला प्राप्त असायला हवी. आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे की, भीष्माचार्यांना इच्छामरणाची शक्ती प्राप्त होती. म्हणूनच महाभारत युद्धात शरपंजारी झाल्यानंतरही त्यांनी मृत्यूला रोखून धरलं आणि उत्तरायण काळ सुरू झाल्यानंतर इच्छामरण स्वीकारले. तुमच्यात ही शक्ती असेल तर तुम्ही इच्छामरणी होऊ शकता. तुमचे आचरण सात्विक असेल तर तुम्हाला ही शक्ती प्राप्त होऊ शकते. तुमचे आचरण तामसी असेल तर तुम्हाला कधीही मृत्यू येऊ शकतो. माझ्या वडिलांनाही इच्छामरण प्राप्त झाले. ते मला म्हणाले, मला आपल्या गावी घेऊन चला आपलं घर मला पाहायचं आहे. मी त्यांना गावी घेऊन गेलो. गावातल्या घरी आम्ही पोहोचलो तेव्हा त्यांनी पाणी प्याले, विश्रांती घेतली आणि रात्री देहत्याग केला. तुम्ही ठरवलंत तर प्रत्येक गोष्टीवर तुम्ही संयम राखू शकता, नियंत्रण राखू शकता. तुम्ही तुमच्यावर संयम मिळवला तर तुमचा 'ऑरा', म्हणजेच तुमच्या भोवतीचं तेजोवलय आपोआप वाढू शकेल आणि ते वाढलं की, तुम्ही जो विचार कराल तो सत्यात येण्यास मदत होते. तुमच्या आशिर्वादाला बळ प्राप्त होते. तुम्ही दिलेला आशिर्वाद सत्यात येऊ शकतो. तुम्ही आध्यात्मिक प्रगती करीत रहाल तर तुमच्या मनात जे असेल ते खरं होण्याची सिद्धी तुम्हाला प्राप्त होईल या मार्गाने तुम्ही इच्छामरणाची शक्ती मिळवू शकता.

सर्वांची गती, सर्वांचा पोषणकर्ता, सर्वांचा प्रभु, सर्वांचा साक्षी-सखा ही परमेश्वराची विविध रूपं आहेत आणि त्याच्या अव्यक्तलीला आहेत. परमेश्वर सर्वांच्या ठायी आहे. म्हणजे मी सर्वांच्या ठायी आहे आणि सर्व माझ्या ठायी आहे. हा आहे समत्व भाव, समत्व दृष्टी. उदाहरण दयायच झालं, तर एक झाड आहे; झाड लावणं किती अवघड आहे. पण ते तोडणं किती सोप आहे, हे ज्यावेळेस आपल्याला लक्षात येईल त्यावेळेस आपल्या हातातील कुऱ्हाड आपोआप गळून पडेल. तुम्ही विचार कराल की, झाडातही आपल्यासारखाच जीव आहे, आपल्यासारखचं भगवंताचं

रूप आहे त्यावेळी तुमच्या लक्षात येईल की, तुम्ही त्याच्यावर अन्याय करीत आहात. हे ठीक आहे की, त्या झाडाला लागलेली फळं प्रत्येकजण आनंदाने चाखू शकतो. झाड जर मृत झालेलं असेल तर त्याचं लाकूड वापरण्यास काहीच हरकत असणार नाही. विनाकारण झाडांची कत्तल करणं, तोड करणं हे योग्य नाही. तुमची दृष्टी तुम्ही बदलली पाहिजे.

परमेश्वराने आणखी एक हमी दिली आहे. समजा तुम्ही वयाच्या साठाव्या सत्तराव्या वर्षी गीतावाचन सुरू केलं, म्हातारपणी तुम्हाला परमेश्वराची आठवण झाली, आयुष्य संपायला पाच-दहा वर्षं उरली असताना परमेश्वराचं नाव घेण्याचं भान तुम्हाला आलं, तरी पण हरकत नाही. भगवंत म्हणतात, दूरवर्तीने का होईना कोणी जर अनन्यभक्तीने माझी उपासना करीत असेल, तर तो साधु समजावा; कारण त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला झाला आहे. तो लवकरच धर्मात्मा होतो भगवंत म्हणतात. ‘हे अर्जुना, माझा भक्त कधीही अधोगतीला जात नाही, हे तू पक्के समज.’ परमेश्वराची आपण भक्ती करतो म्हणजे तो मस्तकी मोरपीस धारण केलेला, हातात बासरी असलेला, हातात अशोक चक्रं असलेलाच असेल, असं नाही. तो सर्वत्र आहे. तुम्ही श्रीकृष्णाची भक्ती करता, उपासना करता म्हणजे समस्त सृष्टीवर प्रेम करायला लागता. आता जे वर्णन केलं ते परमेश्वराचं व्यक्त रूप आहे त्या पलीकडे परमेश्वर अव्यक्त आहे. सामान्यजणांना अव्यक्त परमेश्वराची पूजा करणं कठीण वाटतं. त्यामुळे आपण परमेश्वराच्या व्यक्त स्वरूपाचं पूजन करतो.

गीतेतील एक सिद्धान्त असा आहे की, ‘जो मनुष्य जन्माला येतो त्याला मृत्यू आहे’, जीवन जगत असताना मनुष्याला कोणत्या ना कोणत्या व्याधी होणार, त्याला वार्धक्य आल्यानंतर त्याचा मृत्यू होणार हे अटळ आहे. मनुष्याला वार्धक्य येणंही अटळ आहे. कोणीही मनुष्य कायमस्वरूपी तरुण राहू शकत नाही. त्यामुळे जी तरुण मुलं आपल्या वृद्ध आई-वडिलांचा छळ करतात, त्यांना हे समजलं पाहिजे की, एक दिवस तेही वृद्ध होणार आहेत. त्यावेळी त्यांच्या मुलांनी त्यांचा असाच छळ केला तर? आज एकट्या-दुकट्या राहणाऱ्या वृद्धांचं जीवन कठीण झालं आहे कोणी त्यांच्यावर हल्ला करून त्याचं आहे नाही ते लुटून नेतो. रस्त्यावरून जाणाऱ्या वृद्ध स्त्रीचे दागिने ओरबाडून नेतो. प्रसंगी त्यांची हत्या करतो. अशाप्रकारे लुटालूट करणारे कधी म्हातारे होणार नाहीत का?आपण आपल्याकडे असलेल्या तारुण्याचा, ताकदीचा उपयोग समाजासाठी केला पाहिजे. तुम्हाला मिळालेली ही ऊर्जा आहे,

तिचा उपयोग तुम्ही चांगल्या प्रकारे केला पाहिजे. ते एक वरदान आहे. त्याचा उपयोग लोकांसाठी केला पाहिजे असं सांगणारा हा ग्रंथ आहे.

भगवान श्रीकृष्णांनी गीतेत म्हटलं आहे, 'जय मी आहे, निश्चय मी आहे, सात्विक माणसातील सात्विक गुण मी आहे, शासन करणाऱ्याचं साधन दंड मी आहे मौनी लोकांमधील मौन मी आहे, आणि ज्ञानी लोकांचं ज्ञानही मी आहे. थोडक्यात, माझ्यामध्ये सारं काही सामावलेलं आहे, ते सगळ्या विश्वात भरून राहिलेलं आहे; भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या विनंतीवरून त्यांच्या विराटरूपाचं दर्शन त्याला घडवलं, त्याचं वर्णन गीतेमध्ये आहे, ते अद्‌भुत आहे. ते वर्णन वाचून आपण परमेश्वराचा विचार करतो तेव्हा आपल्याला जाणवतं की आपण किती क्षुल्लक आहोत, किती तुच्छ आहोत. या जाणिवेने आपला अहंकार गळून पडण्यास मदत होते.

गीता सांगते, तुम्हाला जो वेळ मिळालेला आहे. त्याचा सदुपयोग करा, आज एखादी बस पकडण्यासाठी लोक धावपळ करतात. एकमेकांना धक्के देतात, तसं करू नये. प्रत्येकाने आपल्याजवळ असलेल्या वेळेची जाणीव ठेवली पाहिजे. आपला वेळ जबाबदारीने खर्च केला पाहिजे. असं म्हटलं जाते की वेळ, पैसा आणि शक्ती या अशा गोष्टी आहेत की, ज्या नाश पावल्या तर परत मिळत नाहीत. याचा विचार करून त्यांचा योग्य वापर केला पाहिजे.

मृत्यू परांत जीवन कसं आहे हे आपल्याला माहीत नाही, पण आपण जर जीवनात चांगली कामं केली असतील तर ते चांगलचं असणार, याची हमी परमेश्वराने आपल्याला दिली आहे; आपल्या चांगल्या कर्मामुळे प्राप्त झालेल्या चांगल्या गोष्टींचा चांगल्या प्रकारे उपभोग घ्यायलाही आपण शिकलं पाहिजे. तेही महत्त्वाचं आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'विश्वरूप दर्शन' घडवलं, माझ्या वाचनात असं आलं आहे की, महंमद पैगबरांना सुद्धा अशा प्रकारचं काहीतरी दर्शन झालं होत म्हणजेच त्या-त्या धर्मात त्या-त्या पंथात अशा प्रकारचे सिद्धान्त दिसतात. लोकांना जीवन-मंत्र देणाऱ्या सर्वच दैवी पुरुषांच्या जीवनात आपल्याला साधर्म्य आढळतं. कृष्णाचा जन्म कंसाच्या कारागृहात झाला तर येशू ख्रिस्तांचा जन्म गोठ्यात झाला. अशी अनेक साम्यस्थळं आढळतात. भगवान श्रीकृष्ण म्हणतात जो पुरुष सर्व कर्म माझी म्हणजे परमेश्वराची म्हणून करतो, मत्परायण होऊन राहतो. माझी भक्ती करतो, आसक्तीरहित असतो. तो मला येऊन मिळतो.

बाराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी भक्तियोग सांगितला आहे. या अध्यायात सगुण भक्तीविषयी श्रीकृष्णांनी सांगितलं आहे. ते म्हणतात, जे माझ्यासाठी मन लावून परमश्रद्धेने माझी उपासना करतात ते मला परमयोगी वाटतात. परंतु, अव्यक्त ब्रह्माच्या उपासनेत ज्यांचं मन गढून गेलं आहे, त्यांना अधिक कष्ट पडतात. देहवान मानवी प्राण्यांना अव्यक्त ब्रह्माची प्राप्ती मोठ्या कष्टाने होते. आपण जेव्हा व्यक्त आणि अव्यक्त ब्रह्माचा उपासनेच्या संदर्भात विचार करतो तेव्हा लक्षात येतं की, अव्यक्त ब्रह्माची कल्पना करणं किंवा ते डोळ्यासमोर आणणं अवघड आहे. परंतु, काही धारणांच्या अनुसार परमेश्वर हा अव्यक्त आहे, व्यक्त नाही, त्यामुळे तिथे उपासना करण्यास खूप अधिक कष्ट पडतात. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, तुम्ही कोणत्याही मार्गाने, रूपाने गेलात तरी अंतिमत: माझ्याकडे येणार आहात. आणि भक्तीत तल्लीन झालेल्या भक्तांचा मी विलंब न लावता स्वीकार करतो. असं म्हणतात ना, 'भगवान के घर देर है, अंधेर नही!' भगवंतानी पुन्हा पुन्हा ही हमी दिली आहे, 'तू माझ्यापाशी चित्त ठेव, मी तुझी काळजी घेईन.'



भगवंतांनी म्हटलं आहे, 'शत्रू आणि मित्र, मान आणि अपमान, शीत आणि उष्ण, सुख आणि दुःख ही ज्याला समान झाली आहेत, ज्याला कसलीच आसक्ती नाही, निंदा व स्तुती जो समान मानतो, जे काही प्राप्त होईल त्यात संतुष्ट असतो आणि ज्याला घरादाराची आसक्ती नसते, ज्यात तो ममता ठेवत नाही, असा स्थिर बुद्धी भक्तिमानपुरुष मला प्रिय होतो.' मी एकदा वेदांत ॲकॅडमीचे प्रमुख पार्थसारथी यांचं व्याख्यान ऐकायला गेलो होतो; त्या व्याख्यानात त्यांनी सांगितलं होतं की, 'आजकाल प्रत्येक मनुष्याचं जीवन हे त्याचं कुटुंब झालेलं आहे, तुमचं कुटुंब तुमच्या केंद्रस्थानी असेल, तर हरकत नाही मात्र ते तुमचा परीघ बनू नये, याचा अर्थ, कुटुंब आपलं सर्वस्व बनू नये. कुटुंबाच्या पलीकडेही जग आहे, आपले शेजारी आहेत, मित्रमंडळी आहेत, नातेवाईक आहेत, आपला समाज आहे, आपलं गाव आहे, आपलं राज्य आहे, आपला देश आहे, आपलं जग आहे, आणि त्याही पलीकडे

आपली सृष्टी आहे. या सगळ्याचं भलं होईल, चांगलं होईल, हा विचार तुम्ही केला पाहिजे.

तेराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ योगाविषयी सांगितलं आहे. या अध्यायात भगवंतानी ज्ञानाची व्याख्या केली आहे. ती म्हणजे, इंद्रियांच्या विषयांच्या ठिकाणी विरक्ती असणे, निरंकार वृत्ती, जन्म, मरण, वार्धक्य, व्याधी हे आपल्या मागे लागलेले दोष आहेत अशी बुद्धी असणे, अनासक्ती, स्त्री, पुत्र, घर, संपत्ती याविषयी आसक्ती नसणे, इष्ट व अनिष्ट यांच्या प्राप्तीत नेहमी चित्ताचं समत्व ठेवणे, निम्बक म्हणजे एकांत जागी राहणं, विषयासक्त लोकांच्यात मिसळण्याची आवड नसणे, अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धी असणे व तत्त्वज्ञान्यांच्या सिद्धान्तांचे परिशीलन या साऱ्या गुणांना 'ज्ञान' म्हणतात. या व्याख्येमध्ये अभिमानाचा अभाव असणे, अहिंसा, क्षमाशीलता, वागणुकीत सरळपणा, गुरू सेवा, शुचिर्भुतपणा, स्थैर्य आणि मनोनिग्रह या गुणांचाही समावेश होतो. आज आपण पाहतो की, माणसं ही धृतराष्ट्रासारखी आंधळी झाली आहेत. स्त्री, पुत्र, गृह यांच्या आसक्तीमध्ये गुरफटली आहेत. तेच त्यांना सर्वस्व वाटत आहे, संपत्तीसाठी हाणामाऱ्या होत आहेत, स्वतःचं घर भरण्याचा प्रयत्न लोक करताहेत. हे सगळं माणसाला टाळता आलं पाहिजे. हे सगळ्यांना माहीत आहे की, आपण जन्माला येतो तेव्हा मोकळ्या हाताने येतो आणि मरण पावतो तेव्हाही मोकळ्या हाताने जातो. तरीपण मोहमायेने ग्रासलेले सर्वजण पुन्हा पुन्हा त्यामध्ये गुरफटत राहतात आणि भगवंतापासून दूर राहतात.

चौदावा अध्याय हा 'गुणत्रय विभाग योग' हा आहे. यामध्ये भगवान श्रीकृष्णांनी सत्त्व, रज व तम या गुणांविषयी सांगितलं आहे. प्रकृतिपासून उत्पन्न होणारे हे तीन गुण निर्विकार आत्म्याला देहात बांधून ठेवतात. आज आपण बारकाईने पाहिलं तर सगळीकडे तमोगुण पसरत आहे, कारण हा गुण मोहात पाडणारा आहे, तो अज्ञानापासून उत्पन्न होणारा आहे आणि जीवात्म्याला दुष्कृत्य, आळस आणि निद्रा यामध्ये बद्ध करणारा आहे. तमोगुणाची समाजात वृद्धी होणं हे काही चांगलं लक्षण नाही, तो विनाशाकडे नेणारा आहे म्हणूनच या गुणांपासून मनुष्याने दूर राहिलं पाहिजे. रजोगुण हा कामना आणि आसक्ती यांपासून उत्पन्न होणारा आहे आणि तो जीवाला कर्माच्या आणि त्याच्या फलांच्या आसक्तीने बांधून ठेवणारा आहे. आज अनेक लोक या गुणाच्या मागेमागे जाताना दिसतात आणि फारच थोडे लोक सात्विक गुणाच्या मागे असल्याचं दिसतं. हा गुण प्रकाशदायी आहे. निर्विकार आहे. तो सुख

आणि ज्ञानाच्या निर्मळ संगतीने जीवात्म्याला बांधून ठेवतो. तमोगुणी व्यक्तीला तामसी व दुर्गंधीयुक्त आहार आवडतो. आज आपण पाहतो की दुधासारखे चांगले पदार्थ सोडून अनेक लोक दारुच्या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. मद्याचा प्रचंड प्रमाणात उपभोग घेतला जात आहे. हे लक्षात घेतले, तर आज तमोगुण किती पसरला आहे हे दिसेल.

पंधराव्या अध्यायात भगवंतांनी 'पुरुषोत्तम योग' सांगितला आहे. भगवंत म्हणतात की परमेश्वर श्रेष्ठ आहे, तो सर्वत्र भरलेला आहे. जीवात्मा हा कान, नाक, डोळे, त्वचा, जीभ आणि मन या पचेन्द्रियांत अधिष्ठित होऊन विषयांचा उपभोग घेतो. मात्र, विषयांचा उपभोग घेत या जीवनपथावरून जात असताना अज्ञानी लोक या जीवात्म्यास जाणत नाहीत आणि 'हेच माझे जीवन' असं म्हणत आयुष्य काढतात. असं म्हणतात की, अलेक्झांडरने सर्व जग आपल्या पराक्रमाने जिंकलं, सर्व सुखांचा उपभोग घेतला पण मरण जवळ आल्यानंतर त्याने लोकांना सांगितलं, 'मी मेल्यानंतर मला तिरडीवर बांधताना माझे हात बांधू नका. हा अलेक्झांडर जन्माला येताना मोकळ्या हातांनी आला आणि मेल्यानंतर मोकळ्या हाताने गेला, असं जगाला कळू द्या.' ज्ञानरूपी नेत्र असलेले ज्ञानी लोकच आत्म्याला जाणतात. आत्म्याला जाणणारे ज्ञानी लोक परमात्म्याला जाणतात, त्याला 'पुरुषोत्तम' संबोधतात. अध्यात्म ज्ञानाने माणूस ज्ञानी होतो. माणसाने हा ध्यास सतत जपला पाहिजे कारण अध्यात्म ज्ञान हे नित्य ज्ञान आहे. ज्याप्रमाणे संगणकावरील प्रोग्रॅम आपण सतत 'अपडेट' करत असतो तसंच अध्यात्म ज्ञानाचं सुद्धा नित्य वाचन, पठण, चिंतन करायला हवं व त्यानुसार माणसाने वागायला हवं.

सोळावा अध्याय हा 'दैवसुरसंपद विभाग योग' आहे. यामध्ये दैवीसंपत्ती घेऊन येणारा कोण आहे याचं वर्णन भगवंतांनी केलं आहे ज्याच्यामध्ये निर्भयता आहे, सात्विक वृत्ती आहे, ज्ञान व कर्मयोग या दोहोंविषयी तत्परता आहे. दान, इंद्रिय, निग्रह, यज्ञ, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोधाचा अभाव, त्याग, शांती, दुष्टबुद्धीचा अभाव, प्राणी मात्रांविषयी दया, निर्लोभीपणा, नम्रता, तेजस्वीता, क्षमा गुलिर्भुतपणा, द्वेषांचा अभाव, अभिमानाचा अभाव अस हे सद्‌गुण दैवी संपत्ती घेऊन येणाऱ्यांच्या ठायी असतात. असं भगवंतांनी म्हटलं आहे. आसुरी प्रवृत्तीच्या माणसाला मात्र काय करावं आणि करू नये हे समजत नाही, ते एका ठिकाणी स्थिर नसतात, अस्थिर असतात, त्यांना सदाचरणाविषयी जाण नसते म्हणून ते पापाचरणात लिप्त असतात.

आज आपण पाहतो की, स्वतःचा अभिमान बाळगणारे अनेक अहंकारी लोक आहेत. माझ्याजवळ इतके धन आहे, आणखीही धन माझे होईल, इतके ऐश्वर्य मी मिळवलं आहे. आणखीही मला मिळणार आहे, ह्या शत्रूला मी मारलं, दुसऱ्या शत्रूंनाही मी मारीन, माझ्यासारखा दुसरा कोणी नाही अशी दर्पोक्ती ते उच्चारत असतात. भगवंतांनी अशा लोकांच वर्णन केलं आहे. हे लोक म्हणतात, मीच ईश्वर आहे व मीच ऐश्वर्य भोगणार आहे. भगवंत म्हणतात, अशाप्रकारचा अहंभाव अज्ञानामुळे आसुरी लोकांच्या जवळ असतो. अशाप्रकारे नानातऱ्हांच्या भ्रमात अडकलेले, मोहांच्या जाळ्यात गुरफटलेले आणि विषयभोगात लंपट झालेले आसुरी स्वभावाचे लोक नरकात जातात. हे लोक परमेश्वराचाच द्वेष करतात. भगवंतांनी म्हटलं आहे की मी त्यांना पुन्हापुन्हा त्यांच्या मूळ योनीत म्हणजे आसुरी योनीत पाठवतो. थोडक्यात, त्यांचा मूळ स्वभाव बदलण्याची काहीच शक्यता नसते. कुत्र्याचं शेपूट नळीत घालून सरळ करण्याचा प्रयत्न केला तरी ते पुन्हा मूळपदावर येते. त्यांचा मूळ स्वभाव त्यांना अधम गतीला घेऊन जातो.

या ठिकाणी मला असं सांगावसं वाटतं की, हा मूळ स्वभाव हा स्वधर्म आहे. आसुरी प्रवृत्तीच्या लोकांची अधम वृत्ती त्यांचा धर्म आहे. त्याचप्रमाणे सात्विक प्रवृत्तीच्या लोकांची सात्विक वृत्ती हा त्यांचा धर्म आहे. आंब्याच्या झाडाला कोणी पाणी घालणारा असेल किंवा त्याला दगड मारणारा कोणी असेल झाड दोघांनाही सारखाच आंबा देतं आणि तो सारखाच गोड असतो. संत कबीर यांची एक गोष्ट आहे. कबीर नदीत स्नान करत असताना त्यांच्या हातात विंचू आला. त्याला वाचविण्यासाठी त्यांनी त्याला नदीकाठच्या वाळूत सोडण्याचा प्रयत्न केला परंतु विंचवाने त्यांना दंश केला. त्यामुळे कबिरांना वेदना होऊन त्यांनी हात झटकला आणि विंचू पुन्हा पाण्यात पडला. कबीर त्याला पाण्याबाहेर सुरक्षित वाळूमध्ये सोडण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत राहिले पण तो पुन्हा पुन्हा त्यांना दंश करत होता. हा सगळा प्रकार पाहात असलेले लोक त्यांना म्हणाले तो तुम्हाला वारंवार दंश करत आहे, तुम्ही त्याला वाचविण्याचा प्रयत्न का करीत आहात? यावर कबिरांनी दिलेल उत्तर खूप समर्पक आहे. खूप मार्मिक आहे, ते म्हणाले, ‘दंश करणं हा विंचवाचा स्वधर्म आहे, मरण जवळ असतानाही तो धर्म सोडायला तयार नाही, मग मी तर माणूस आहे. चांगलं कर्म करणं हा जर माणसाचा स्वधर्म असेल, आणि त्याच्या दंशांनी मी जर मरणार नसेल, तर माझा स्वभाव, माझा स्वधर्म मी का सोडावा?’

सतरावा अध्याय 'श्रद्धामय विभाग योग' हा आहे. भगवंतांनी म्हटलं आहे, शास्त्रशुद्ध संस्कार नसलेली आणि स्वाभाविकपणे उत्पन्न झालेली श्रद्धा सात्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारची असते. आहार, दान, तप, कर्म या साऱ्यांमध्ये हे तीन प्रकार असतात आणि ते परिणाम घडवतात. तामसी लोकांना अर्धवट शिजलेलं, रसहीन, दुर्गंध सुटलेलं, शिळं, उष्टं असं अन्न आवडतं. राजस वृत्तीच्या लोकांना तिखट, आंबट, खारट, कडू, अतिउष्ण, झणझणीत असं अन्नं आवडतं तर सात्विक वृत्तीच्या लोकांचा आहार आयुष्य, बुद्धी, बल, आरोग्य, सुख व प्रेम वाढवणारा तसंच स्निग्ध रुचकर शरीरात स्थिर राहणारा, मन प्रसन्न करणारा असा असतो. थोडक्यात, जो आहार आरोग्यवर्धक आहे. तो सात्विक आहे, असंच गीतेमध्ये म्हटलं आहे. आज जंकफूडचा जमाना आहे. हे जंकफूड आरोग्यासाठी कसं योग्य नाही हे शरीरशास्त्राचा दाखला देऊन सांगितलं जातं; पण त्याचा उपयोग लोकांवर होत नाही. या जंकफूडच्या अतिरेकी सेवनाचे काय परिणाम होतात; हे आपण पाहतो. त्यामुळे असा आहार टाळला पाहिजे, हे हजारो वर्षांपूर्वी गीतेद्वारे भगवंतांनी माणसाला सांगितलं आहे.

तपाचे तीन प्रकार गीतेत सांगितले आहेत. देव, ब्राम्हण, गुरू व ज्ञानीजन याचं पूजनं करणं; पवित्रता, सरलता, ब्रह्मचर्य आणि अहिंसा याचं आचरण करणे; हे 'शारीरिक तप' आहे वेदशास्त्रांचं अध्ययन उद्वेगकारक नसणारे प्रिय व यथार्थ भाषण तसंच परमेश्वराच्या नामाचा अखंड जप हे 'वाणीचे तप' आहे, तर मनाची प्रसन्नता, शांतभाव, मौन, परमेश्वर चिंतनाचा निग्रह व अंत:करणाचं पावित्र्य हे 'मानसिक तप' आहे. सात्विक वृत्तीचे लोक तप करताना या तीनही तपांच्या आदर्शांच पालन करतात. त्यामुळे त्याला 'सात्विक तप' म्हणतात. मोठेपणा मिळवण्याची इच्छा बाळगून आणि पाखंडीपणाने केलेले तप हे राजस तप असतं तर मूर्खपणाच्या हट्टाने केलेले मन वाणी व शरीराला पीडादायक तसंच दुसऱ्याचं अनिष्ट करण्याच्या हेतूने केलेलं तप हे तामस तप आहे.

दान करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं समजून, ज्याने आपल्यावर कुठलाच उपकार केलेला नाही अशा व्यक्तीसही केलेले, योग्य वेळी, योग्य स्थळी, योग्य व्यक्तीस जे दान केलं जातं ते 'सात्विक' दान होय. परंतु, केलेल्या दानाची परतफेड होईल या किंवा इतर काही फलांच्या अपेक्षेने केलेले, आणि जे देताना देणाऱ्याच्या मनाची तडफड होते, ते दान 'राजस' मानलं जातं आणि अयोग्य काळी, अयोग्य

वेळी आणि अयोग्य व्यक्तीला तसंच अवहेलनापूर्वक केलेलं दान हे 'तामस' मानलं जात. आज आपण प्रत्येक गोष्टीत पाहतो, मग त्या सवलती असोत, सबसिडी असो, देणग्या असोत किंवा अन्य कोणत्याही प्रकारची मदत, दान असो, हे सर्व कोणत्या ना कोणत्या हेतूने केलं जातं. त्यामध्ये सात्विकतेचा अभाव दिसतो. पैसा हेच आज सर्वस्व बनलं आहे, पैशांशिवाय कामं होत नाहीत. छोट्याछोट्या कामांसाठी सुद्धा लाच द्यावी लागते. आज कोणत्याही बाबतीत देणाऱ्यालाही समाधान नाही आणि घेणाऱ्यालाही समाधान नाही, त्यामुळेच सगळी गडबड होताना दिसते.

अठरावा आणि शेवटचा अध्याय 'मोक्ष संन्यास योग' आहे. या अध्यायामध्ये भगवंतांनी म्हटलं आहे यज्ञ, दान, तप ही कर्मं प्रत्येकाने केलीच पाहिजेत. ती टाळून चालणार नाहीत, तेच कर्तव्य आहे. ही कर्मे फलांची अपेक्षा व आसक्ती न ठेवता, केली तर त्यामुळे अंतःकरणाची शुद्धी होते. भगवंतांनी असंही म्हटलं आहे की, ज्याची बुद्धी मलीन आहे, ज्याचं मन अहंकाराने भरलेलं आहे, जो विषयभोगात गुरफटलेला आहे, अशा संस्कारहीन अज्ञानी लोकांना जरी, ज्याची बुद्धी सांसारिक पदार्थांत आणि संपूर्ण कर्मात लिप्त होत नाही अशा पुरुषाने मारलं तरी तो मारणारा ठरत नाही, त्या कर्माचं पाप त्याला लागत नाही. आजच्या काळात, आजच्या परिस्थितीत वाईट वर्तनाला शिक्षा करण्याचा अधिकार न्यायालयांना म्हणजेच दंडशक्तीला आहे. पण त्याचा वापर जसा करायला हवा, तसा केला जात नाही. गुन्हेगारांना कठोर शासन व्हायला पाहिजे. समाजात नैतिकता वाढवण्यासाठी हे आवश्यक आहे. गुन्हेगाराला कडक शिक्षा सुनावली गेली तर समाजाला आनंदच वाटतो.

बुद्धीसुद्धा सात्विक, राजस व तामस या प्रकारची असते. कोणती गोष्ट धर्मतः ग्राह्य, धर्मतः अग्राह्य कोणती कृती योग्य कोणती अयोग्य, कशापासून भीती बाळगावी कशापासून बाळगू नये कोणती गोष्ट बंधनकारक, कोणती मोक्षप्रद हे जे लोक जाणतात त्यांना 'सात्विक बुद्धी'चे म्हणतात. धर्म व अधर्म, कर्तव्य व अकर्तव्य यामधील फरक जाणत नाहीत ते लोक राजस बुद्धीचे मानले जातात आणि जे अधर्माला धर्म, चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगलं मानतात ते लोक 'तामस बुद्धी'चे मानले जातात.

गीतेमध्ये चार वर्णाची कर्मं सांगितली आहेत. गीतेत असं म्हटलं आहे, की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र आहे. ज्याचा जो स्वभाव आहे त्याप्रमाणे तो जाऊ शकतो. उगाच मारून, मुटकून काही करण्यात मजा नसते. ब्राह्मणाचे कर्म अंतःकरणाचा

निग्रह, इंद्रियांचं दमन, आस्तिक बुद्धी, शास्त्रविषयक ज्ञान, धर्माकरता कष्ट सहन करणं, परमाहम् तत्त्वाचा अनुभव ही सांगितलेली आहेत. शौर्य, तेज, धैर्य, चातुर्य, युद्धातून पलायन न करणं, दान, स्वामीभाव, शरणागतास अभय देणे ही क्षत्रियाची कर्तव्य सांगितली आहेत तर शेती, गोपालन, खरेदी-विक्री, सचोटीने व्यापार ही वैश्याची अणि सर्व वर्णांतील लोकांची सेवा-शुश्रूषा करणं ही शूद्राची लक्षणं सांगितली आहेत. परमेश्वराने म्हटलं आहे की, आपापल्या स्वाभाविक कर्मात एकनिष्ठ असलेल्या पुरुषाला परमसिद्धी लाभते म्हणजेच मोक्षाची दारे सर्वासाठी खुली आहेत. याचा अर्थ असा आहे की, ज्याचे जसे स्वाभाविक गुण आहेत तसं कर्म तो स्वीकारू शकतो आणि त्या कर्मानुसार वैश्य-शूद्र वर्णात जन्मलेला ब्राह्मण क्षत्रिय वर्णात जाऊ शकतो तसंच ब्राह्मण क्षत्रिय वर्णात जन्मलेला वैश्य-शूद्र वर्णात जाऊ शकतो. यात जात-धर्म वगैरे काही नाही. या गोष्टी पुढच्या काळात कधीतरी शिरल्या असाव्यात. ज्याने त्याने आपापल्या वर्णाचं काम शुद्ध अंत:करणाने केलं तर त्याला मोक्षप्राप्ती होते, असं गीतेमध्ये भगवंतांनीच सांगितलं आहे.

भगवंत अर्जुनाला सांगतात की, मी लढणार नाही, हा तुझा निश्चय व्यर्थ्य आहे, कारण तुझा स्थायी स्वभाव, तुझा प्रकृती विवेक तुला युद्ध करण्यास भाग पाडणारचं. परमेश्वराने अर्जुनाला आणि पर्यायाने समस्त मानव-जातीला वारंवार खात्री दिली आहे की, माझ्या ठायी ये, माझा भक्त हो माझी उपासना कर, माझ्या मनासारखं कर, मी तुझी सर्व काळजी घेतो. माझा तू आवडता आहेस; म्हणून मी तुला हे गुह्य सांगत आहे. जो माझी परमभक्ती करतो तो निःसंशयपणे मलाच येऊन मिळेल. भगवंतांनी गीतापठण करणं, श्रवण करण हे पुण्यकर्म असल्याचं सांगितलं आहे. गीतेच कथन करणारा, प्रसार करणारा हा माझा परमप्रिय असून तो निःसंशय मलाच येऊन मिळेल, माझं दर्शन त्याला घडेल, असं म्हटलं आहे.

भगवान श्रीकृष्ण रणांगणात अर्जुनाला गीता सांगत असताना संजयाने त्याला लाभलेल्या दिव्य-दृष्टीने पाहिलं आहे, ऐकलं आहे म्हणूनच संजय म्हणतो-

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

ज्या पक्षाला योगेश्वर कृष्ण आणि रणपंडित अर्जुन असेल, त्याच पक्षाला राज्यलक्ष्मी, विजय, शाश्वत कल्याण आणि राजनीती असे चारही पुरुषार्थ लाभणार



असे माझे मत आहे. याचा आपण जर सखोल विचार केला तर आपल्या लक्षात येईल आज जे राजकारण आपण पाहतो आणि अनुभवतो आहोत ती राजनीती नव्हे. राजकारण नीतीने केलं तरच त्याला राजनीती म्हणता येईल; आपण पाहिलं की, भगवद्गीता मनुष्य जीवनाच्या जीवन व्यवहाराच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करते. जीवन कसं जगावं याचं मार्गदर्शन करते. मनुष्य जन्माचा आदर्श माणसासमोर ठेवते म्हणूनच हा एक महान ग्रंथ आहे आणि त्याचं वाचन त्याचा अर्थ समजून घेऊन प्रत्येकाने केलं पाहिजे.